**MHKO120005112012**

<u>नियमित दिवाणी दावा क्र.१५८/२०१२</u>
(CNR No.MHKO120005112012)

## <u>निशाणी क्र.८२ खाली आदेश</u>

वादी यांनी सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ व आदेश ६ नियम १७ प्रमाणे वारसा नोंद करणेसाठी त्यांच्या दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. वादींच्या कथनानुसार, वादी क्र.१ - शोभा रामचंद्र पाटील या दि. २५/१०/२०२३ रोजी दोनवडे, ता. भुदरगड येथे मयत झाल्या आहेत. त्यांना पती रामचंद्र, दोन मुले - सुनिल व अजित व एक मुलगी - विद्याताई असे कायदेशिर वारस आहेत. प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादींच्या विरुध्द कब्जा मिळणेकरीता, नुकसान भरपाई करीता, हक्कज्ञापन व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचा विषय व कारण मयताचे पश्चात वारसदार यांचेशी निगडीत असुन अखंड चालुच राहात असल्याने व वादी यांचे कायदेशिर हक्क दावा मिळकती संदर्भात गुणदोषावर निश्चित करणेसाठी व उभय पक्षकारांच्यामधील वाद पुर्णतः एकाचवेळी निर्गत करणेसाठी वादी यांना सदर कामी मयत वादी क्र.१ यांचे नाव कमी करुन मयताचे कायदेशिर वारसदार यांची नांवे दाव्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी वादी यांनी प्रस्तुत अर्ज मंजूर होण्याची विनंती केली.

०३. सदर दुरुस्ती करणेस वादी यांना परवानगी दिलेस प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही व वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद कायमचे सोडविण्यास व सुलभ न्यायदान करणेस मदत होणार आहे. सबब वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी तर्फे विधिज्ञ यांनी आपले म्हणणे दाखल करुन वादींनी मागणी केलेल्या दुरुस्तीस त्यांची तीव्र हरकत असल्याचे नमुद केले आहे. प्रतिवादींचे कथनानुसार, अर्जातील कथने चुकीची आहेत. अर्जात नमुद केलेले वारस हेच मयताचे वारस असलेबाबत योग्य पुरावा हजर केलेला नसल्याने सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली.

०५. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०६. दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील प्रश्नबिंदु माझ्या निदर्शनास येतात. सदर प्रश्नबिंदु त्यावरील निष्कर्ष व कारणमीमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदु** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादी मागणी प्रमाणे दावा दुरुस्तीचा आदेश मिळण्यास पात्र आहेत का ? | होकारार्थी |
| २) | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

### प्रश्नबिंदु क्रमांक १ व २ करिता कारणे :- (दावा दुरुस्ती व आदेश)

०७. प्रश्नबिंदु क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते चर्चेकरीता एकत्रित विचारात घेण्यात आले आहेत.

०८. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दावा दुरुस्तीच्या अर्जाच्या कामी दाव्यातील गुणदोषांवर भाष्य करणे योग्य ठरत नाही व प्रस्तुत दुरुस्तीच्या अर्जाने जर दाव्यातील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यास मदत होत असेल व प्रकरणातील

पुढील अडचणी टाळण्यासाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी मदत होणार असेल तर दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. तसेच, सदर दुरुस्तीनंतर प्रतिवादी यांना सुद्धा त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी मिळणार आहे. तसेच प्रकरणामध्ये दावा मिळकतीशी संबंधीत सर्व माहिती अभिलेखावर असणे अत्यावश्यक आहे.

०९. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ६, नियम १७ मधील तरतूदीनुसार न्यायालयीन कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास त्याच्या वाद कथनास न्याय असेल अशा रीतीने फेरबदल करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. त्यामुळे, प्रकरणातील पुढील अडचणी टाळण्यासाठी तसेच बहुविध दाव्यांची संख्या कमी करण्यासाठी सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे उपरोक्त सर्व बाबींचा विचार करून मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या दाव्यामध्ये दुरुस्ती करावी.

३. वादी यांनी दुरुस्त दाव्याची प्रत मुदतीत अभिलेखावर सादर करावी.

सही/-
**( व्ही. बी. मुल्ला )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी

दि. २७/०२/२०२४